दिव्य मराठी

धाराशिव जिल्हा 23-09-2024

व्याख्यान • आदर्श महाविद्यालयात आयोजित हिंदीदिनी प्रतीक्षा पांगे यांचे मत

# मोबाइलच्या अति वापराने जगण्यावर परिणाम

प्रतिनिधी | उमरगा

शालेय आणि महाविद्यालयीन मुलां-मुलींमध्ये मोबाईल वापरण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे.शैक्षणिक विकासापेक्षा युट्यूब-वर मोबाईल वापराकडे विद्यार्थ्यांचा कल वाढला आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे जगण्यावर विपरित परिणाम होवू लागले आहे. शालेय अन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मोबाईल वापरावर प्रेम करण्यापेक्षा आपल्या आईवडिलांच्या प्रत्येक श्वासावर प्रेम करावे, असे आवाहन लातूर येथील तज्ञ प्रतीक्षा पांगे यांनी केले.

आदर्श महाविद्यालयात क्वीक हिल फाऊंडेशन व राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी दिनाचे औचित्य साधून 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या विषयावर पांगे बोलत होत्या. प्राचार्य डॉ. दिलीप गरूड अध्यक्षस्थानी होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. सुरेश कुलकर्णी, डॉ राम सोलंकर,डॉ अनुराधा मिरगणे उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रतिक्षा पांगे म्हणाल्या, आजची तरुणाई ही मोबाईलच्या अति वापराने स्वतःचे अस्तित्व विसरत चालली आहे. याऐवजी नातेवाईकांशी प्रत्यक्ष संवाद साधून नात्यातील जवळीकता अधिक दृढ करा, तसेच बुद्धीला व शरीराला चालना मिळण्यासाठी विविध खेळ खेळण्याचे आवाहनही त्यांनी केले.



प्रतिक्षा पांगे यांनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा-वर मार्गदर्शन केले.

## फसवणूक टाळा

मोबाईलद्वारे फसवणुकीच्या प्रमाणात वाढ होत आहे. फोटो मार्फिंग, पासवर्ड सुरक्षा, बँकिंग फेककॉल, ऑनलाईन गेमिंग, फेक मेसेज, हॅकिंग, थर्ड पार्टी ॲप्लीकेशन ओटीपी या विविध मोबाईल वापर प्रकाराने व्यापारी,शेतकरी,महिला , मुले-मुलीची मोठया प्रमाणात आर्थिक व मानसिक फसवणूक केली जात आहे. ओटीपी अनोळखी व्यक्तींना सांगू नका,फेक लिंक क्लीक करूनका. फेसबुक वॉटसअॅप, सोशल मिडिया वापरा पासून मुलांमुलीना दूर ठेवा व व्यायाम करण्याचे आवाहन त्यांनी केले.